# । अर्थ ।

आर्थिक विषयांच्या अभ्यासास
प्राधान्य देणारे त्रैमासिक

जुलै ते सप्टेंबर १९८२ वर्ष ७ वे अंक २ रा

# आर्थिक समालोचन

## संपादकीय

### औद्योगिक उत्पादन –

जून १९८१ पासून तो जून १९८२ या मागील वर्षात औद्योगिक उत्पादनात मंदीचे प्रमाण वाढत गेले. विशेषतः जानेवारी ८२ ते जून ८२ या अर्ध वर्षात ' उत्पादकता वर्ष ' जाहीर करूनही बऱ्याच मोठ्या उद्योगात प्रत्यक्ष मंदी आणि त्यांना संलग्न असलेल्या मध्यम व लघुउद्योगात मंदीचे वातावरण गडद झाले. जुलै–ऑगस्ट या दोन महिन्यात या समस्येवर उद्योग क्षेत्रातील लोकांनी भरपूर चर्चा व विचारविमर्श करून पत–कोंडीचे धोरण (Credit Sqaeege) आणि औद्योगिक घसरण यांच्यातील परस्पर संबंधावर भर दिला.

मध्यवर्ती सांख्यिकी संघटनेने उपलब्ध केलेली या संबंधीची आकडेवारी योग्य अभ्यासास उपयुक्त होईल जून १९८२ च्या औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक १६५.९ होता तर मे महिन्यात तो १६५.४ होता. म्हणजेच एक महिन्यात फक्त ०.५ टक्क्यांनी उत्पादनात वाढ झाली आहे. ऑगस्ट १९८२ मध्ये उत्पादनाचा निर्देशांक त्याहून वाढला आहे. उदाहरणार्थ ट्रॅक्टर उत्पादनात २० टक्के, मोटार सायकल उत्पादनात १३ टक्के, सोडा अंश ९ टक्के, सुती धागे ४% वाढ जुलै ते ऑगस्ट या १ महिन्याच्या अवधीत झालेली दिसते. रिझर्व्ह बँकेचे पतधोरण थोडे सौम्य केल्य मुळेही हे घडले असेल.

### विद्युत पुरवठा –

ऑगस्ट महिन्यापासून वीज उत्पादन वाढले असून जुलैच्या तुलनेने त्यात १.३ टक्का वाढ झाली आहे. सप्टेंबर महिन्यात वीजपुरवठा १२ हजार दशलक्ष किलोवॅट झाला असल्यामुळे उपादनासंबंधी, आशादायक झुळूक दिसते

### किमती –

गेल्या वर्षातील सप्टेंबरशी तुलना करता या वर्षातील सर्वसाधारण किमतींचा निर्देशांक २.१ टक्क्याने वाढला आहे. ज्यूट, ताग, लोखंड, पोलाद इ. च्या किमतीत थोडी वाढ झाली. साखर, खांडसरी, गूळ, खाद्यतेले, डाळी यांच्या किमतीत सौम्य घट झाली. पण १५ ऑक्टोबर १९८२ नंतर सिमेंटच्या किमतीत अचानक व आश्चर्यजनक वाढ झाली असून बांधकाम साहित्य, मजुरी यांमध्ये फार वाढ झाली. उदा. गेल्या ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यात सिमेंट ७१ रु. गोणी वरून १०० रु. गोणी झाले असून बाजारातून गडप झाले आहे.

### चलन पुरवठा –

(चलन, बँक ठेवी + मुदत ठेवी रिझर्व्ह बँक ठेवी) यामध्ये ऑगस्ट–सप्टेंबर या अवधीत ३५८ कोटी रु. वाढ झाली. मागील वर्षाच्या सप्टेंबरमध्ये

पुरवठा ७४,२१४ कोटी रु. होता. या वर्षी सप्टेंबरमध्ये तो आकडा ६६,५३८ कोटी रु. आहे.


### पतधोरण –

ऑक्टोबर २६ ला खंडेनवमीला दुर्गापूजेच्या उत्सव काळात रिझर्व्ह बँकेने नवे पतधोरण जाहीर केले. गेले ३ महिने जे पतनियंत्रण कठोर करण्यात आले होते ते गुणात्मक पद्धतीने शिथिल करण्यात येईल. यामुळे

( पान क्र. ३ वर पुढे चालू )

# Now!
# Central Bank introduces one-thousand-rupee travellers cheques

**The safe, convenient way of carrying big money around—or keeping it.**




**SAFE:** Your signature will be on the cheques and only you can encash them. Sign in front of the cashier of any nationalised bank and you will receive the cash immediately. (Also encashable at well-known shops, department stores, hotels, airlines and at important railway stations).

Currency notes may attract thieves—travellers cheques won't. Also, if you lose the cheques you can get your money back from the issuing branch.

**CONVENIENT:** Much better to carry or keep one travellers cheque of Rs.1000 than ten notes of Rs.100.

Also, there is no charge. And no time limit for encashing the cheques.

Central Bank issues travellers cheques of Rs.500 and Rs.100 too.

**Central Bank of India**
A Government of India Undertaking
The bank that moves out to people and places

# ॥ अर्थ ॥

आर्थिक विषयाच्या अभ्यासास
प्राधान्य देणारे त्रैमासिक

● वर्ष ७ वे अंक दुसरा

एप्रिल ते जून – १९८२

वार्षिक वर्गणी : रुपये तीस

संपादक–प्रा. कमलाकर परचुरे

जुलै ते सप्टेंबर अंक

संचालिका – सौ. श्यामा परचुरे

मानद कार्यकारी संपादक – शशिकांत ताम्हाणे

संचालन सहाय्य – कु. मोना परचुरे, कु. बीना परचुरे

संपादन सहाय्य – श्रीवल्लभ कुवळेकर, सुरेश ढमढेरे

संपर्क – १५ फर्ग्युसन कॉलेज आवार, पुणे–४
दूरध्वनी नं. ५२७०९

---

औद्योगिक उत्पादनातील मंद वातावरण सुधारण्यास गति मिळेल आणि उत्पादकता वर्षाच्या अर्ध्या उरलेल्या काळात औद्योगिक उत्पादनात भर पडण्याची शक्यता आहे. मुदती ठेवींवर ११ टक्के व्याज देऊ केल्यामुळे बँकाच्या ठेवीत ७ हजार कोटीची वाढ अपेक्षित आहे. पतधोरण सौम्य होईल. ही अपेक्षा होती कारण अर्थमंत्री प्रणव मुकर्जी आणि रिझर्व्ह बँकेचे नवे गव्हर्नर डॉ. मनमोहनसिंग या दोघांना पतधोरण, निवडक क्षेत्रात वाजवी व विधायक व्हावे असे वाटत होते.

## कृषिक्षेत्र हवामान –

हवामान खात्याचे राष्ट्रीय संचालक डॉ. पी. के. दास यांनी १९७९–८० आणि १९८२–८३ या दोन अवर्षण ग्रस्त वर्षांमधील साम्य दर्शविले आहे. त्यांच्या मते सपूर्ण देशात पावसाळी ऋतूत ३० टक्के पाऊस कमी झाला आहे. पुन्हा १९७९ च्या तुलनेने या वर्षाचा पाऊस अकाली झाला आहे त्यामुळे चालू शतकातील अवर्षणाचे अत्यंत वाईट वर्ष असे डॉ. दास यांचे मत आहे. त्यामुळे या वर्षाचे कृषि उत्पादनाचे लक्ष्य (१२८ दशलक्ष टन) हे सुमारे १० टक्क्याने कमी होईल. याचाच अर्थ गहू, तांदूळ या प्रमुख अन्न पिकांची टंचाई भासेल. त्याकरता सरकारने महागडा दर देऊन परदेशातून गहू आयात केला असून टंचाई भरून काढण्याची बेगमी केली. परंतु देशातील शेतकऱ्यांना गव्हाला जास्त भाव देण्याची सरकारची अजूनही तयारी दिसत नाही: तो भाव दिल्यास चलन वाढीचे भय, सबब म्हणून युक्तिवादात वापरली जाते.

**रिझर्व्ह बँकेचे नवे गव्हर्नर** डॉ. मनमोहनसिंग हे अर्थशास्त्राचे एक अभ्यासू प्राध्यापक संशोधक म्हणून ख्यातनाम आहेत. पंजाब विद्यापीठात बी. ए., एम्. ए. ला १ ल्या श्रेणीत १ ले येऊन केंब्रिजचा ट्रायपॉस व ऑक्सफोर्डची डॉक्टरेट त्यांनी मिळवून जागतिक बँकेचे अध्यक्ष डॉ. मॅकनमारा यांचेकडून शाबासकी मिळविली आहे. सरकारचे आर्थिक सल्लागार, नियोजन मंत्रालयाचे सचिव. नियोजन मंडळाचे सदस्य इ. मोठ्या जबाबदारीच्या जागा त्यांनी सांभाळल्या अर्थशास्त्रीय परिषदातही ते नेहमी भाग घेऊन अजून ही शोध निबंध लिहिणे, स्वाध्याय संशोधन करणे यात रस घेतात. समाजवादी पुरोगामी विचारांकडे त्यांचा कल असला तरी वास्तववादी व व्यवहारवादी भूमिका घेण्यासही ते तत्पर असतात. नवे पतधोरण त्यांनी नुकतेच जाहीर केल्यामुळे रिझर्व्ह बँक, उत्पादकता वर्षाच्या दृष्टीने काही आक्रमक व धाडसी पाऊले घेईल असे वाटते. □□

---

● टीप : मागील अंकात चुकून वर्ष ८ वे असे छापले होते. काही ग्रंथपालांनी ही चूक निदर्शनास आणून दिली. धन्यवाद !

# अर्थ'ला पुन्हा उभारी देणारा नवा कार्यकर्त्यांचा संच

गेली सात वर्षे अर्थ महाराष्ट्रात आर्थिक विषया संबंधीची सोप्या भाषेत माहिती देवून महाविद्यालयीन प्राध्यापक, विद्यार्थी, अर्थशास्त्राचे अध्ययन करणारे, बँका, उद्योग, व्यापार इ. क्षेत्रातील अधिकारी, आर्थिक प्रश्नाविषयी कुतूहल जिज्ञासा असणारे सर्वसामान्य वाचक यांना संदर्भ साहित्य पुरविण्याचे कार्य करीत आहे. आतापर्यंत हे कार्य एक खांबी तंबूप्रमाणे चालू होते. त्यामुळे अर्थाचे प्रकाशन पत्रव्यवहार, हिशेब, बिले वर्गण्या इ. संबंधी नित्याचे कामकाज व्यावसायिक दर्जाचे (Professional efficiency) होत नव्हते.

ऑक्टोबर महिन्यात माझे एक तरुण मित्र, चाहते श्री. शशिकांत ताम्हाणे हे अर्थाचे मानद कार्यकारी संपादक म्हणून मला लाभले आहेत. ते स्वतः व्यवस्थापन क्षेत्रातील अनुभवी अधिकारी व कुशल संघटक आहेत. त्यांच्या सहकार्यामुळे अर्थाला खरा भक्कमपणा प्राप्त झाला आहे. यापुढे अर्थ नियमितपणे प्रसिद्ध होईल. पाने वाढतील. अर्थातील साहित्याचा दर्जा व व्याप्ती वाढून अक उत्तरोत्तर अधिक उपयुक्त होतील.

संचालन विभागात कु. बोना व कु. मोना परचुरे आणि संपादकीय विभागात श्रीवल्लभ कुवळेकर आणि सुरेश ढमढेरे यांचे सहाय्य गेले सहा महिने मिळते आहेच. त्या सर्वांच्या कामांना योग्य दिशा, गति आणि मार्गदर्शन करण्याचे कार्य श्री ताम्हाणे समर्थपणे करतील यात शंका नाही. हा कार्यकर्त्यांचा संच सुविद्य मेहनती आहे.

दिवाळी अंक 'उत्पादकता विशेषांक' म्हणून प्रसिद्ध करीत असून त्यात डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव, डॉ. लकडावाला, डॉ. ब्रह्मानंद, डॉ. माथुर, डॉ. सर्वेश्वरराव इ. विद्वान अर्थतज्ज्ञांचे आणि उद्योगपती बँकर, वित्त-तज्ज्ञ इ. चे लेख व मुलाखती असतील. दिवाळी अंकानंतर ज्यांच्या वर्गणींचे नूतनीकरण डिसेंबर १९८२ पर्यंत झाले असेल त्यांनाच जानेवारीचे अंक पाठविले जातील. वर्गणीदारांनी कृपया आपण कोणत्या अवधीपर्यंत वर्गणी भरणा केली त्याचा खुलासा करावा म्हणजे १९८३ ची सुधारित वर्गणी-यादी व्यवस्थित तयार करता येईल.

'अर्थ' चे वाचक, वर्गणीदार, जाहिरातदार, लेखक व चाहते यांना ही दिवाळी व नूतन वर्ष सौख्याचे जावो.

# भावांजली

किर्लोस्कर इलेक्ट्रीकल्स्, बंगलोरचे अध्यक्ष व कार्यकारी संचालक, 'अर्थ' चे सुरवातीपासूनचे चहाते, तडफदार व कर्तृत्ववान उद्योगपती श्री. **रविंद्र किर्लोस्कर** यांच्या निधनाने, 'अर्थ' ला अतिव दुःख झाले आहे.

शेतकरी संघटनेचे तेजस्वी नेते, 'अर्थ' चे वाचक – श्री. शरद जोशी यांच्या पत्नी **सौ. लीला जोशी** यांच्या दुर्दैवी निधनाने आम्हांस अत्यंत दुःख झाले आहे.

श्री. शरद जोशी यांच्या निवासस्थानी स्वतः मी अनेकदा गेलो आणि सौ. जोशी यांच्या प्रेमळ आतिथ्यशीलतेचा लाभ मिळाला. शरदरावांना त्यांच्या सर्व कार्यात मित्र, गृहिणी, सचिव व सल्लागार म्हणून सौ. लीलाबाईंची जोड होती. श्री शरद जोशी यांचे सांत्वन याचसाठी मुद्दाम आवश्यक आहे कारण की, त्यांच्या गतिमान नेतृत्वाची शेतकरी संघटनेला आणि ग्रामीण आर्थिक प्रगतीसाठी विशेष गरज आहे.

या निधनामुळे श्री. शरदरावांना त्यांचे मनोधैर्य टिकवणे निश्चितपणे अवघड जाईल.

# लोकसंख्या, आर्थिक विकास व रोजगार

डॉ. सुनंदा सोनीरीकर
प्रपाठक, अर्थशास्त्र विभाग, नागपूर विश्वविद्यालय, नागपूर

लोकसंख्येच्या बेसुमार वाढीचा आर्थिक विकासावरील दुष्परिणामांचा विचार अनेक विकास प्रारूपात झालेला आहे. परंतु दारिद्र्याला प्रामुख्याने कारणीभूत होणाऱ्या बेकारीचा, लोकसंख्या व आर्थिक विकास यांचा परस्पर संबंध यावर फारसा विचार झालेला दिसत नाही. बेकारी निर्मूलन हे भारत सरकारने आपले प्रमुख उद्दिष्ट मानले आहे. लोकसंख्येचा भविष्यकालीन आकार, रचना व श्रमसंख्या याचा अंदाज विकास योजना तयार करणे, अंमलात आणणे व तिचे मूल्यमापन करणे यासाठी अत्यंत आवश्यक आहे. लोकसंख्येच्या अंदाजावरून योजनाकृत्यांना भावी गरजा-अन्न, वस्त्र, घर, शिक्षण वगैरे आणि या गरजा निर्माण करण्यासाठी लागणारा व उपलब्ध असलेला श्रमपुरवठा यांची कल्पना येऊ शकते. या दृष्टीने या तीन घटकांच्या सैद्धांतिक संबंधाचा विचार करण्याचा अल्पप्रयत्न या निबंधात केलेला आहे.

**समस्येचे स्वरुप** – १९७० साली श्रमिकांची जागतिक संख्या १,५०७ दशलक्ष होती. १९७०-८० या दशकात ती २७० दशलक्षानी, १९८०-९० मध्ये ३३५ दशलक्षांनी व १९९०-२००० मध्ये ४१० दशलक्षांनी वाढून २००० साली ही वाढ एकण १०२२ दशलक्ष इतकी होईल असा अंदाज आहे. विकसित राष्ट्रात ही वाढ १४२ दशलक्ष राहील व प्रत्येक दशकात घटत्या दराने वाढेल. या उलट कमी विकसित राष्ट्रात ती वाढत्या दरानें होत जाईल व एकूण वाढ ८८० दशलक्ष राहील. जगातील श्रमसंख्या १९७०-२००० या तीस वर्षात ६८% ने वाढेल. (विकसीत राष्ट्रात २९ टक्के कमी विकसित राष्ट्रात ८९%) या आकडेवारीचा अर्थ चालू शतकाच्या शेवटास जगाला श्रमिक-संख्येच्या प्रचंड स्फोटास तोंड द्यावे लागणार आहे व त्यामुळे सध्याच भीषण असलेला बेकारीचा प्रश्न अधिकच भयावह होईल.

श्रमसंख्येतील ही वाढ सर्वच प्रदेशात समानतेने होणार नाही. उपलब्ध आकडेवारीनुसार कमी विकसित राष्ट्रांत श्रमिकसंख्येत दरवर्षी ३.३% ने वाढ होते तर विकसित राष्ट्रात ०.४% ने होते. म्हणजेच अविकासत राष्ट्रात विकसित राष्ट्रांच्या तुलनेने ८ पट जास्त श्रमिक वाढतात. त्यामुळे ८ पट जास्त रोजगार निर्माण करावे लागतील या उलट आर्थिक विकास व रोजगारी निर्मितीसाठी लागणारी दरडोई साधनसामग्री अविकसित राष्ट्रात विकसित राष्ट्रांच्या $\frac{१}{१५}$ इतकीच उपलब्ध आहे. याप्रमाणे प्रत्येक नवीन रोजगाराच्या निर्मितीसाठी अविकसित राष्ट्रातील साधनसामग्री विकसित राष्ट्रांच्या $\frac{१}{१२०}$ $\left( \frac{१}{१५} \times \frac{१}{८} \right)$ म्हणजे १ टक्के पेक्षाही कमी आहे.

या आकडेवारीवरून अविकसित राष्ट्रे विकसित राष्ट्राचे अंधानुकरण करून त्याच्यात भांडवलप्रधान तंत्राचा वापर करून रोजगारनिर्मितीचा प्रयत्न करतील तर त्यांच्या गरजेच्या फक्त १% रोजगार ते उपलब्ध साधनाच्या सहाय्याने करू शकतील. सध्या दुर्दैवाने अविकसित राष्ट्रातील रोजगाराची वेगवेगळ्या क्षेत्रांतील (Sectors) वाटणी व त्यासाठी भांडवली गरज विकसित राष्ट्रापेक्षा कमी आहे परंतु, या राष्ट्रांनी आपले रोजगारनिर्मितीचे धोरण विचारपूर्वक न आखल्यास बेकारीचा प्रश्न अधिकच बिकट होत जाईल यात शंका नाही.

**लोकसंख्या व श्रमसंख्या –** श्रमसंख्येतील वाढ व लोकसंख्येतील वाढ यांचा संबंध तसे पाहिल्यास बराच सोपा वाटतो. सर्वसाधारणत: लोकसंख्या वाढली की श्रमिकसंख्येत वाढ होईल व बेकारी निश्चित वाढेल असा समज आहे परंतु हा समज फारच उथळ ठरू शकतो. कारण लोकसंख्या वाढली की त्याच किंवा थोड्याफार कमीजास्त प्रमाणात मागणी वाढून उत्पादनाची गरज व त्यामुळे श्रमिकांची उत्पन्न मागणीही वाढू शकेल आणि श्रमपुरवठा व श्रममागणी यात अंतर राहणार नाही असेही एक मत व्यक्त केले जाते.

परंतु रोजगारीवरील लोकसंख्येचा परिणाम इतका साधा सरळ नाही. श्रममागणी केवळ उत्पादनाच्या मागणीवरच अवलंबून नसून इतर सहाय्यक उत्पादक घटकांच्या पुरवठ्यावर / उपलब्धतेवरही अवलंबून आहे. भांडवल, कच्चा माल यांच्या अभावी लोकसंख्येची उपभोगक्षमता वाढली तरी त्या प्रमाणात उत्पादनक्षमता वाढेलच असे नाही. श्रमिकसंख्या वाढली की त्यांना उत्पादनसाहित्य पुरविण्यासाठी जास्तीची गुंतवणूक आवश्यक ठरते. परंतु वाढलेल्या लोकसंख्येमुळे उपभोगखर्च वाढून बचत घटते व गुंतवणुकीचा दरही घटतो. याउलट लोकसंख्या कमी असल्यास उपभोगखर्च कमी, बचत जास्त व म्हणून गुंतवणुकीसाठी भांडवलनिर्मिती जास्त अशी परिणाम परंपरा आढळते.

रोजगार निर्मितीचा प्रश्न याप्रमाणे केवळ भांडवल व इतर साधनांच्या तुटवड्यापुरताच मर्यादित नाही. उत्पादनतंत्रातील बदल आणि श्रमिकांच्या उत्पादकतेतील बदल हे देखील या दृष्टीने महत्त्वाचे ठरतात.

**लोकसंख्या वाढीचा दर व रोजगारवृद्धी –** साधारणत: लोकसंख्या वाढीच्या दराचा रोजगारावरील परिणाम हा त्या वाढीच्या तीन आर्थिक परिणामांवर अवलंबून असतो.

१) आर्थिक विकासाचा दर

२) उत्पादनाची रचनात्मक विभागणी (Structure of Output)

३) विकासाची दिशा व प्रकार (Pattern of Growth)

कमी जनन दरामुळे राष्ट्रीय उत्पन्नातील बचत वाढून भांडवलवृद्धी होते व विकासकार्यासाठी भांडवल उपलब्ध होते.

लोकसंख्या बदलाचे श्रमसंख्येवरील परिणाम साधारणत: २० वर्षानंतरच दृग्गोचर होतात. जनन दरातील बदलामुळे अल्पकाळात देशातील श्रमपुरवठ्यावर काही परिणाम होत नाही. त्यामुळे वाढलेल्या भांडवलाच्या सहाय्याने उत्पादन वाढवून विकास साधता येतो. २० वर्षानंतर रोजगार वाढलेले राहतील व नवीन श्रमिकांना सहज सामावून घेता येईल असाही एक विचार मांडला जातो. या विचारात जननदाराच्या घटीमुळे भांडवल निर्मितीवर होणाऱ्या चांगल्या परिणामांचाच तेवढा अंतर्भाव केलेला आहे परंतु कमी जननदरामुळे उत्पादनक्षेत्र व श्रमाची उत्पादकता यावरील परिणामांचा अंतर्भाव झालेला नाही. विविध लोकसंख्याधिष्ठीत (Demographic) आर्थिक प्रारुपातील निष्कर्षानुसार जननदरातील घटीचे दरमाणशी उत्पादनावरील व त्यामुळे उत्पादनाची मागणी व श्रमाची व्युत्पन्न मागणी यावरील सुपरिणाम साधारणत: १० वर्षानंतर ३% ते ५% आढळतात. दरमाणशी उत्पन्नतील जननदर घटीचा हा अल्प फायदा १० वर्षाच्या कालावधीत श्रम उत्पादकतेत जरी वार्षिक ०.३ ते ०.५ टक्के इतकी अल्प वाढ झाली तरी रोजगारनिर्मितीच्या दृष्टीने निष्फळ ठरू शकते. दरडोई उत्पन्नाच्या वाढीच्या इतर परिणामावरून उत्पादकतेत एवढी वाढ सहज होईल हे लक्षात येते. दरडोई उत्पन्न वाढल्याने लोकांचे जीवनमान उंचावून त्यांचे आरोग्य स्वास्थ, उत्पादनकौशल्य व क्षमता वाढते. जननदर घटल्याने कुटुंबाचा आकार कमी होतो व ६/१५ वयोगटात अधिक शिक्षण-प्रशिक्षण, चांगले कौटुंबिक वातावरण इत्यादींचा चांगला परिणाम श्रमिकांच्या उत्पादन क्षमतेवर होतो. त्याचप्रमाणे १० वर्षाच्या या कालावधीत भांडवलाची उपलब्धता वाढल्याने उत्पादनतंत्रात देखील बदल संभवतो. उत्पादनतंत्र सुधारून किंवा प्रगत राष्ट्रातील भांडवलप्रधान उत्पादनतंत्राचा वापर

केल्याने उत्पादनातील श्रम: भांडवल प्रमाण घटून वाढलेल्या भांडवल गुंतवणुकीचा परिणाम रोजगार वाढण्यात होणार नाही. श्रमउत्पादकतेतील वाढीमुळे सध्याचीच श्रमसंख्या अधिक काम करू शकेल व उत्पादनतंत्रातील सुधारणेमुळे श्रमाची मागणीही घटेल.

जननदर घटीमुळे श्रमपुरवठा कमी वाढला तरी दर

डोई उत्पन्नात वाढ व त्यामुळे श्रमाच्या मागणीत घट झाल्यामुळे दीर्घकाळात बेकारी कितपत कमी होईल याची शंका आहे. अंतिम परिणाम श्रमाच्या मागणी पुरवठ्यावरील या परिणामांच्या परिणामांवर अवलंबून राहील.

लोकसंख्या, दरडोई उत्पन्न व अर्थव्यवस्थेची संरचना (Structure of Economy) त्याच्या परस्पर संबंधांचे जे अभ्यास करण्यात आले त्यावरून जास्त दरडोई उत्पन्नांत कृषीचा हिस्सा कमी आणि उद्योग, वाहतूक व इतर सेवांचा हिस्सा सापेक्षतेने जास्त आढळतो. कृषि श्रमप्रधान तर उद्योग भांडवलप्रधान असतात. त्यामुळे दरडोई उत्पन्न वाढले किंवा वाढवायचे असले तर कृषिचे उत्पन्नातील महत्व कमी होऊन उद्योगांचे वाढते.

परिणामी रोजगार निर्मिती आवश्यक त्या प्रमाणात होण्याची शक्यताही कमी राहते. याप्रमाणे जननदराच्या भिन्न दरांचे रोजगार निर्मितीवरील परिणाम, अर्थव्यवस्थेमधील कृषीचे प्रमाण, कृषि व इतर उद्योगातील श्रमप्राधान्य व भूमीची उपलब्धता यावर अवलंबून राहील.

लोकसंख्या वाढीचा दर, आर्थिक विकास व रोजगारनिर्मिती, यांच्या संबंधात विकास कोणत्या मार्गाने साधला जातो तेही महत्त्वाचे ठरते. उदा. मोठमोठे भांडवलप्रधान कारखाने, खाणी व कृषीचे व्यापारीकरण (Commercialization) यांच्या वाढीमुळे एखाद्या अर्थव्यवस्थेत आर्थिक विकास घडून येईल तर दुसऱ्या एखाद्या अर्थव्यवस्थेत अनेक लघु व मध्यम प्रमाणावरील उद्योग व शेती यांच्या वाढीमुळे तितकाच विकास घडून येईल. या दोन उदाहरणातील आर्थिक विकासाचा रोजगारावरील परिणाम भिन्न राहील. पहिल्याने रोजगारनिर्मिती कमी तर दुसऱ्यात जास्त होईल. Dharam P. Ghal यांनी Population Growth Labour Absorption and Income Distribution.' यावरील लेखात जलद वाढणाऱ्या लोकसंख्येमुळे दुसऱ्या प्रकारच्या विकास प्रक्रियेला उत्तेजन मिळेल असे मत व्यक्त केले आहे.

अविकसित राष्ट्रांमध्ये रोजगारीचा प्रश्न अधिकच गुंतागुंतीचा होतो कारण भांडवली साधनांचा तुटवडा व भांडवलप्रधान उत्पादनतंत्र यांच्या जोडीला बहुतेक राष्ट्रात श्रमिकांच्या मागणी पुरवठ्यात गुणवत्तेनुसार फार असंतुलन आहे. त्यामुळे विशिष्ट कौशल्याच्या क्षेत्रात श्रमपुरवठा कमी, तर इतर व्यवसायात पुरवठा जास्त आढळतो. परिणामी कुशल व गुणवत्तापात्र व्यक्ती कमी कौशल्याचे काम करताना आढळतात तर काही क्षेत्रात कुशल श्रमांच्या अभावी कामे अडतात. अर्थव्यवस्थेच्या स्थित्यतराच्या काळात हे असंतुलन फारच जाणवते.

लोकसंख्या वाढीच्या भिन्न दरांचे रोजगारीवरील अंतिम परिणाम वर विवेचन केल्याप्रमाणे घटकांच्या प्रत्यक्ष परिणामावर अवलंबून राहातील हे उघड आहे. विकासाच्या लोकसंख्याधिष्ठीत आर्थिक प्रारूपात या परिणामांचा परिणामात्मक अभ्यास केला जातो. परंतु बहुतेक प्रारूपात रोजगारावरील, परिणामांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या कार्यक्षम वयोगटातील लोकसंख्येमधील प्रत्यक्ष कार्यरत लोकसंख्येचा दर, (Rate of Participation) श्रम उत्पादकतेवरील परिणाम, श्रमपुरवठा व मागणी यांच्यातील रचनात्मक असंतुलन व भांडवलवृद्धीचे उत्पादनतेवरील परिणाम या घटकांचा विचार केला जात नाही. ह्या घटकांच्या अंतर्भावामुळे प्रारूप अधिकच गुंतागुंतीचे होतील हे जितके खरे तितकेच त्यांना वगळल्याने निघणारे निष्कर्ष चुकीचे किंवा विसंगत राहतील हेही खरे आहे.

**सारांश रुपाने जननदर घटीचे खालील परिणाम संभवतात –**

१) जननदर घटल्याने श्रमसंख्या कमी होईलच असे नाही. लहान कुटुंब व कमी गर्भधारणा यामुळे

स्त्रिया जास्त प्रमाणात श्रमबाजारात येतील. (सध्या भारतात १५ ते ५९ वयोगटातील स्त्रियांच्या कार्यरततेचें प्रमाण फक्त १९ टक्के आहे.) व प्राथमिक कार्यरततेचे प्रमाण ११.८६ टक्के आहे. (पुरवठा +) (Crude L. F. Participation rate)

२) आर्थिक विकासाचा परिणाम देखील स्त्रियांच्या कार्यरततेच्या प्रमाणावर होतो. विकसीत राष्ट्रात हे प्रमाणअधिक तर अविकसित राष्ट्रात कमी राहते. जननदर घटल्याने आ. विकास झाल्यास हे प्रमाण वाढल व श्रमपुरवठा वाढेल. (पुरवठ +)

३) आर्थिक विकासाने दरमाणशी उत्पन्न वाढल्यास उच्च शिक्षणाची ओढ व आवड वाढून श्रमसंख्येत कमी वाढ होईल. (पुरवठा–)

४) दरडोई उत्पन्न वाढल्याने श्रमाच्या गुणवत्तेत उत्पादकतेत भर पडेल. विविध कल्याणकारी सेवांमुळेही असाच बदल होईल. हा परिणाम श्रमविपणीतील नव्या श्रमिकांना विशेष लागू होईल. पौष्टिक अन्न, शिक्षण-प्रशिक्षण चांगले कौटुंबिक वातावरण यामुळे त्यांची गुणवत्ता अधिक राहील, उत्पादकतेतील श्रमाची मागणी घटेल. (मागणी–)

५) भांडवलवृद्धीमुळे भांडवलप्रधान उत्पादनतंत्राची वाढ होऊन श्रममागणी घटेल. (मागणी–)

६) श्रमपुरवठा व मागणी यात रचनात्मक असंतुलन विशिष्ट कौशल्याचा अभाव, उपलब्ध रोजगारसंधी व शिक्षित श्रमिकांच्या अपेक्षा यातील विजोडता यामुळे रोजगार परिस्थिती बिघडू शकते.

या विवेचनावरून रोजगारनिर्मितीचा विचार करता जननदर घटल्यानें रोजगाराचा प्रश्न सोडविणे निश्चित सुलभ जाईल. उत्पादनतंत्रातील बदल, उत्पादकतेतील, वाढ व कार्यरत लोकसंख्येचे प्रमाण या रोजगारदृष्टया निराशाजनक घटकांचाही फायदा करून घेता येईल. परंतु त्यासाठी शिक्षण प्रशिक्षणाचे योग्य नियोजन, उत्पादक घटकाच्या सापेक्ष मूल्यांचे नियंत्रण, श्रमविपणीची रचना व कार्यपद्धती, सुयोग्य उत्पादनतंत्राचा अवलंब व कृषि आणि लघु व मध्यम उद्योगाधिष्ठित विकास योजना अशा धोरणांचा पाठपुरावा करावा लागेल.

□□

# व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग

लेखक – श्री. ग. ना. सप्रे

---

'व्यवस्थापनात कामगारांच्या सहभागाना आवश्यकता' हे तत्त्व आता विवाद्य राहिलेले नाही. त्या सहभागाचे स्वरूप, व्याप्ती आणि मर्यादा ही काय असावीत या बाबतीत फार तर निरनिराळा समांतरे असू शकतील. खाते पातळीवरील उत्पादन प्रक्रियेत कामगारांचे सहकार्य येथपासून तो स्वयंव्यवस्थापन या शेवटच्या पातळींपर्यंत या कल्पनेची निरनिराळी रूपे निरनिराळ्या देशात आपणास पहावयास मिळतात. आणि याचे कारण म्हणजे या कल्पनेमागील मूळ तत्त्वाला असलेली अर्थशास्त्रीय, मानसशास्त्रीय आणि राज्यशास्त्रीय बैठक.

वेब्ज पतीपत्नींनी १८९७ साली लिहिलेल्या आपल्या 'औद्योगिक लोकशाही' या ग्रंथात प्रथम ही कल्पना मांडली आणि आल्डूस हक्सलेसारख्या विचारवंतांनी नंतर त्याचा हिरीरीने पुरस्कार केला, लोकशाही ही केवळ राजकारणापुरती मर्यादित ठेवून चालणार नाही. कारण ते एक जीवनव्यापी आणि सर्वंकष तत्व

आहे. कामगार आपल्या जीवनातला आणि दिवसाचा महत्त्वाचा काळ ज्या ठिकाणी खर्च करतो, तेथे जर एकतंत्री कारभार असेल तर लोकशाहीला आवश्यक असा बळकट पाया कधीच निर्माण होणार नाही. असे त्यांचे प्रतिपादन होते. इंग्लंडमध्ये १९१६ साली सुरू झालेल्या व्हिटले कौन्सिलच्या पाठीमागे मुख्यतः हीच भूमिका होती.

'कामगार व्यवस्थापन सहभागी' या तत्वाला विशेष चालना दुसऱ्या महायुद्धानंतरच मिळालेली दिसते. आश्चर्याची गोष्ट म्हणजे अनेक देशात प्रथमतः व ऐच्छिक स्वरूपाची असणारी ही योजना आता कायदेशीर करून ती सक्तीची करण्यात आली आहे. नेदरलँड, लक्झेंबर्ग, ऑस्ट्रीया, नॉर्वे, स्वीडन, फ्रान्स वगैरे देशात तर यासंबंधी कायदेशीर तरतूद करण्यात आली आहेच. पण आत्तापर्यंत संपूर्णपणे ऐच्छिक स्वरूपात चालू असलेल्या या योजनेला ब्रिटनमध्येही कायदेशीर स्वरूप देण्यात आले आहे. यापेक्षा आश्चर्याची गोष्ट म्हणजे संपूर्ण स्वातंत्र्याचा पुरस्कार करणाऱ्या पश्चिम जर्मनीत या बाबतीत कडक कायदे करण्यात आलेले आहेत.

कामगार सहभागी तत्वाकरिता कामगारांचे व्यवस्थापनेत सहकार्य ही जर पहिली पायरी असेल तर पश्चिम जर्मनीत विद्यमान असलेली 'निर्णय देण्यात सहभाग' ही दुसरी पायरी मानावी लागेल. युगोस्लाव्हियातील स्वयंव्यवस्थापन ही अखेरची पायरी आहे. ही स्वयंव्यवस्थापनेची पद्धती सर्व व्यवहारात, शेतीपासून कारखानदारीपर्यंत, एवढेच नव्हे तर शासन, वाणिज्य संस्था, शैक्षणिक संस्था वगैरेंच्या कारभारातही वापरली जाते.

आपल्या पंतप्रधानांनी दीडवर्षापूर्वी पुरस्कृत केलेल्या २०-कलमी आर्थिक कार्यक्रमात कामगारांच्या उद्योगधंद्यातील भागीदारीला विशेष स्थान देण्यात आले होते. त्यानंतर झालेल्या ४२ व्या घटना दुरुस्तीतही ४३-अ हे मार्गदर्शक तत्व म्हणून घटनेत नमूद करण्यात आले. त्यामुळे साहजिकच या संबंधी आजकाल विशेष चर्चा होत असते. पण याचा अर्थ या तत्वाचा आपल्याला नवीनच साक्षात्कार झाला असे नव्हे. आपण अंगिकारलेल्या सामाजिक आणि आर्थिक तत्वज्ञानाचा तो स्वाभाविक परिपाक आहे. हे या संबंधीच्या आपल्या प्रयत्नांकडे आपण धावता दृष्टीक्षेप टाकला तरी ध्यानात येईल.

शासकीय पातळीवर या संबंधी आपण केलेला पहिला प्रयत्न म्हणजे १९४७ च्या औद्योगिक कलह कायद्यात नमूद केलेली कारखाना समिती या कायद्याप्रमाणे ज्या कारखान्यात शंभर किंवा अधिक कामगार असतील त्या ठिकाणी शासनाने सूचित केल्यावर एका विशिष्ट पद्धतीने कारखाना समिती स्थापन करणे आवश्यक केले आहे. या समितीचा हेतू 'मालक व कामगार यांच्यात चांगले मित्रत्वाचे संबंध निर्माण करून त्यांची जोपासना व वाढ करणे आणि हा उद्देश सफल करण्यासाठी दोन्ही बाजूंना महत्त्वाच्या वाटणाऱ्या बाबींविषयी चर्चा करून त्यात काही मतभेद असल्यास ते मिटविण्याचा प्रयत्न करणे हा आहे. कारखाना समिती आणि कामगार संघटनेचे कार्य यांच्यात विक्षेप निर्माण होऊ नये यासाठी १९५८ साली भरलेल्या १७ व्या भारतीय श्रम परिषदेत एक त्रिपक्ष स्थापन करून या दोहोंचीही कार्यक्षेत्रे विवक्षित करण्याचा प्रयत्न करण्यात आला. या समितीने आपल्या प्रतिवृत्तात कारखाना समितीनें करावयाची कार्ये आणि न करावयाची कार्ये यांचे दिग्दर्शन करणाऱ्या दोन याद्या दिल्या आहेत. साधारणः कामाच्या संदर्भातले प्रश्न हे कारखाना समितीकडे सोपवण्यात आले तर कामगार हितासंबंधी प्रश्न हे सामुदायिक सोडवावे म्हणून मानण्यात आले. एवढे करूनही साधारणतः ५% कारखान्यातूनच कारखाना समित्या स्थापन झाल्या आणि त्यातीलही फारच थोड्या कार्यक्षम ठरल्या.

यानंतर १९५४ साली राष्ट्रीय सभेनें आवडी अधिवेशनात समाजवादी समाजरचनेचा ठराव संमत केला. त्यानंतर १९५६ साली सरकारनें जो औद्योगिक धोरणाचा ठराव मंजूर केला त्यात कामगार हा विकास योजनेला भागीदार असल्यामुळे त्याला चढत्या प्रमाणात व्यवस्थापनेत भागीदार करून घेणे आवश्यक आहे असे स्पष्टपणे म्हटले आहे. त्याचवर्षी सुरू झालेल्या

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत कामगार धोरणविषयक प्रकरणात ही कल्पना अधिक विस्ताराने मांडण्यात आली. त्या ठिकाणी कामगार सहभागाचे पुढील उद्देश सांगण्यात आले आहेत.

अ) कारखाना, कामगार आणि समाज यांच्या हितासाठी उत्पादकतेचो वाढ करणे,

ब) कारखाना आणि उत्पादन प्रक्रिया यात कामगारांना त्यांच्या भूमिकेची समज निर्माण करणे, आणि

क) कामगारांच्या आत्माविष्काराच्या नैसर्गिक प्रवृत्तीला वाव देऊन औद्योगिक शांतता, उत्तम संबंध आणि वाढता सहकार या उद्दिष्टांकडे वाटचाल करणे

पाश्चिमात्य देशात या संबंधी झालेले प्रयोग पाहून त्यांचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारने एक अभ्यास गटही ब्रिटन, फ्रान्स, स्वीडन, बेल्जियम, जर्मनी, युगोस्लाव्हिया वगैरे देशात पाठविला होता. त्यांनी सरकारला सादर केलेले प्रतिवृत्त उपलब्ध आहे. जुलै १९५७ मध्ये भरलेल्या भारतीय श्रम परिषदेत यासंबधात चर्चा करून संयुक्त व्यवस्थापन मंडळाची योजना तयार करण्यात आली. ही योजना ऐच्छिक स्वरुपाची होती. तिचे उद्देश, व्याप्ती, घटना, कार्य पद्धती वगैरे गोष्टी विस्तृतपणे त्या योजनेत समाविष्ट करण्यात आल्या होत्या. पण तरीही खाजगी आणि सार्वजनिक धदे एकत्रित करुनही या मंडळींची संख्या १४० च्या वर कधीच गेली नाही.

या पूर्वेतिहासावरुन एक गोष्ट स्पष्ट होईल ती म्हणजे कामगारांची उद्योगधंद्यात सहभागी ही कल्पना केवळ टूम म्हणून आपण स्वीकारली नाही. आपल्या आर्थिक आणि राजकीय धोरणात तो अतर्भूत झाली आहे. उद्योगधदा हा समाजाच्या मालकीचा असून, भांडवलदार आणि श्रमीक हे दोन्ही त्याचे केवळ विश्वस्त आहेत ही कल्पना महात्मा गांधीनी १९१८ साली प्रथम माडली. या तत्वाची व्यावहारिक परिणती म्हणजेच आजची याजना आहे.

पूर्वीच्या याजनेची शब्दसहती कामगारांची व्यवस्थापनेत भागीदारी अशी होती. पण २०-कलमी आर्थिक कार्यक्रमात 'कामगारांची उद्योगधंद्यात भागीदारी असा बदल करण्यात आला. २३ ऑक्टोबर १९७५ रोजी एका ठरावान्वये भारत सरकारने ही योजना अधिक स्पष्ट स्वरुपात मांडली. तिची वैशिष्टये अशी–

ही योजना लवचिक आणि ऐच्छिक असून गरज वाटल्यास त्यासंबंधी कायदा करण्यात येईल. ५०० किंवा अधिक कामगार असणाऱ्या सर्व क्षेत्रातल्या उद्योगधंद्यांना आणि खाणीना ती लागू आहे. या योजनेच्या दोन पातळ्या आहेत. खाते मंडळी आणि कारखाना पातळीवरील संयुक्त मंडळे. दोन्ही मंडळांची मुदत दोन वर्षे असून त्यांनी खालील विषय हाताळायचे आहेत.

१) उत्पादनाचे मासिक अथवा वार्षिक लक्ष गाठण्यासाठी व्यवस्थापकांना मदत करणे.

२) उत्पादन, उत्पादकता आणि कार्यक्षमता यात वाढ त्यासोबत नासधूस टाळणे आणि यंत्रसामग्रीच्या क्षमतेचा तसेच मानवी शक्तीचा पुरेपूर वापर होणे,

३) विशेषत: कमी उत्पादकता असलेली क्षेत्रे हुडकून काढणे, त्याला जबाबदार असलेले घटक संपुष्टात आणणे आणि सुधारणेच्या दृष्टीने खाते पातळीवर आवश्यक ते पाऊल उचलणे,

४) खात्यातील गैरहजेरीचा अभ्यास करुन ती कमी करण्याच्या दृष्टीने उपाय सुचविणे,

५) सुरक्षिततेचे उपाय,

६) खात्यात शिस्त राखण्याकरिता मदत करणे,

७) उजेड, खेळती हवा, आवाज, धूळ आणि श्रमपरिहार यासारख्या आणि आरोग्यविषयक उपाय.

नवीन योजना तयार करताना पूर्वीच्या योजनातून आलेल्या अनुभवांचा कितपत फायदा घेण्यात आलेला आहे. की नवीन योजना म्हणजे केवळ नव्या बाटलीत भरलेली जुनीच दारु आहे. या प्रश्नांचा विचार करण्यापूर्वी आपण पूर्वीच्या योजनांच्या अपयशांचा कारणमीमांसा करणे इष्ट ठरेल. निरनिराळ्या विद्वानांनी यासंबंधी केलेली निदाने अशा प्रकारची आहेत.

( पत्र सूचना कार्यालय – भारत सरकार )

# आर्थिक करार हमी पत्र तथा बँक गॅरंटी

वसंत नखाते ( नाशिक )

" Banking is not just a money lending business to the rich society but it is in the ultimate analysis a Service to the Society "

व्यक्तिच्या जीवनात कोणत्याही आर्थिक बाबीमध्ये बॅन्केचे सहाय्य असणे ही महत्त्वाची बाब झालेली आहे. मग ती व्यक्ती शेती, उद्योग, व्यापार, वहातूक वगैरे कोणत्याही क्षेत्रात काम करणारी असो. बँका सध्या समाजाची आर्थिक उन्नती कशा प्रकारे वाढविता येईल त्याबद्दल प्रयत्नशील आहेत. त्यामुळे त्या निरनिराळ्या आर्थिक सोयी उपलब्ध करून देत आहेत. व्यक्तीच्या समाजाच्या सुखदुःखात सामील होणे, त्यांना योग्य वेळी निरनिराळे प्रकारे मदत करणे व त्यामुळे राष्ट्रीय उत्पादन निर्यात कशा प्रकारे वाढविता येईल या दृष्टीने सतत पाठपुरवठा करीत आहेत. वेगवेगळी कर्जे कमी अधिक व्याजाने देत आहेत. यास उपयुक्त अशी एक सोय म्हणजे आर्थिक करार, बँक गॅरंटी होय.

इंडियन कॉन्ट्रक्ट अॅक्ट सेक्शन १२६ अन्वये " A Contract of guarantee to perform the promise, or discharge the liability of a third person in case of his default "

बँक गॅरंटी दिली जाते. ती लेखी अगर तोंडी असू शकते. बॅन्क गॅरंटी आदा करतेवेळी. (1) Surey (2) Principal Debtor (3) Creditor याची आवश्यकता असते. या तिघांचे मध्ये अर्थिक करार होत असतो. तो शक्यतो सरकारी फी भरून त्यांचे कागदावर केला जातो. यामध्ये प्रत्यक्ष पैशाचा/रकमेचा कोणत्याही प्रकारे व्यवहार होत नाही. यामध्ये वर उल्लेखीत तिघांचे संगतमताने नियम, अटी व वेळ ठरविणेत आलेली असते व ती मान्य केलेली असते. त्यावर मान्यतेच्या सह्या केलेल्या असतात. हे Tripartite Agreement असते.

बँक गॅरंटीज् ह्या तारणी, बिनतारणी व काही प्रमाणात तारणी अशा असू शकतात. त्या अदा करते वेळी रक्कम अथवा माल काही वेळा तारण म्हणून ठेवून घेतला जातो. ज्यावेळी बॅन्केचा कर्ज व्यवहार तात्पुरता स्थगीत केला जातो. त्यावेळी सदर अर्थिक कराराची साथ उपलब्ध होत असते. कारण यांत रकमेचा उलाढाल नसते. चांगला व्यवहार असणाऱ्या व्यक्तिना, संस्थाना यांचा मर्यादा मंजूर केल्या जातात. यामध्ये पार्टीचा पत ऐपत पाहिली जाते. कारण या करारांत बँकवरही रकमेची जोखीम असते. म्हणून बॅन्का पार्टीकडून Counter Guarantee घेतात. ती बँकेच. Contingent Liability म्हणून धरली जाते.

ही रक्कम प्रत्यक्षांत कर्जाऊ दिलेली नसली तरी बऱ्याच मोठ्या प्रमाणात त्या रकमेची जबाबदारी बॅन्केवर असते. म्हणून त्यावर रिझर्व बँकेने बंधन घातलेले आहे. २०% बॅन्क गॅरंटीज् मिळवून एकूण बिनतारणी कर्जव्यवहार हा एकूण कर्जाच्या १५% पेक्षा जास्त असू नये. म्हणून बऱ्याच वेळा बँका हा आर्थिक करार करताना कमी/अधिक प्रमाणात तारण ठेवून घेतात.

या अर्थिक करारांत ज्यांना काम पूर्ण करून घ्यावयांचे असते ते बँकेमार्फत त्यापार्टीकडून हमी मागतात. एखाद्या पार्टीस बँकेने गॅरंटी दिल्यास, बँक गॅरंटी धारण कारणारे काम वेळेत पूर्ण न झाल्यास बॅन्केला जबाबदार धरून बँकेकडून रक्कम वसूल केली जाते. यावेळी पार्टी (Insolvent) नादारीत जावी लागते. अर्थिक करार हा बहुधा. (१) खरेदीदार व विक्रीदार

(२) गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टर (३) कोर्टाचे कामासाठी (४) नियम, अटी, करार पाळणेसाठी बॅन्केमार्फत केलेला असतो. हा करार व्यापारी स्वरूपांचा असल्यास काही वेळा विक्रीदार खरेदीदारांवर मुदती हुंड्या (Usance Bills) काढतात. त्यामुळे विक्रीदाराने सदर हुंड्या डिस्काऊंट करून बॅकेतून रकमेची उचल करून व्यवहारात आणता येते. बॅकेसही सदर हुंड्यावर Re-finance घेता येतो, अशावेळी गॅरंटीच्या Due Date रक्कम भरणेची जबाबदारी पार्टीवर बॅन्केवर असते. अधिक करारांची मुदत ३ ते १० वर्षापर्यंत असू शकते.

मूळ गॅरंटीज या दोन प्रकारचे असू शकतात. (1) Financial (2) Performance दुसऱ्या गॅरंटी बाबत बॅका फारशा उत्सुक नसतात. कारण ती भविष्य काळांवर अवलंबून असते. ती नितिमत्तेवर अवलंबून असून बॅन्केच्या दृष्टीने धोकादायक असते. संबंधीत कामाची पूर्तता न झाल्यास बॅकेला गॅरंटी पोटी पूर्ण करून द्यावे लागते. किंवा मोबदल्यात रक्कम अदा करावी लागते. यामुळे बॅन्का पार्टीकडून १००% डिपॉझिट घतात. कोणतीही गॅरंटी देताना बॅकेने कामाचे स्वरूप, काळ, रक्कम व अनुभव लक्षात घेणे जरूरीचे असते. Financial गॅरंटी ही थोड्या फार प्रमाणात वेळाळी असते. तिचा काळ कमी असतो सरकारी निमसरकारी कामासाठी ती बहुधा वापरली जाते. कस्टम ड्युटी, डिलरशिप, व निरनिराळे टॅक्सेस, डिपॉझिटस् वगैरे संदर्भात दिली जाते. Deferred Payment Guarantee ही स्थानिक व परकीय मालासाठी, मशिनरीसाठी वापरणेत येते. ज्यावेळी भारतीय व्यापारी एखादा माल, मशिनरी आयात करतो. त्यावेळी सदर गॅरंटी ही परकोय कंपनीस द्यावी. लागते. अशावेळी सदर मालावर, मशिनरीवर बॅन्केचा नजरगहाण चार्ज ठेवला जातो. या गॅरंटीस सरकारतर्फे प्रोत्साहन देण्यात येते कारण मालाची ने-आण होऊन परकोय चलन बऱ्याच काळपर्यंत वापरणेस मिळते सदर गॅरंटी ही भारतात देशांत सुद्धा दिली जाते.

अधिक करारास मुदतीचे बंधन असते. कोर्टात केस दाखल झाल्यास ती कायदेशीर धरली जाते. केस मुदतीत दाखल करावी लागते. कारणे द्यावी लागतात.

गॅरंटीची मुदत संपलेवर ती रद्द केली जाते. काही बॅन्का ती परत मागवून दप्तरी ठेवतात. गॅरंटी दिल्यानंतर बॅन्का Contra Entry दाखवितात. Dr. to Acceptance of Customers Cr. Aceeptance of Custormers व Cr :– Aceeptarse for Custormers म्हणजेच Assets & Liabilities या दोन्ही बाजूस ती Entry येते. ती कर्ज व्यवहारात धरली जात नाही. गॅरंटी बॅकेची लायबिलीटी असून Asset to banker अशी आहे. लायबिलीटी यासाठी की ती Third Party ला दिलेली असते. Assets चे कारण ती कर्जदारांतर्फे दिली जाते. कारण ती काम पूर्ण करून Re-Imbursment करून देणार असतो. गॅरंटी रद्द झालेवर मुदत संपलेवर सदर एन्ट्री उलटून घेतली जाते. गॅरंटी जर मशिनरी / मालापोटी असेल तर बॅन्केने त्यावर आपला चार्ज ठेवावाच अन्यथा तोच माल, मशिनरी दुसरीकडे तारण ठेवून दोनदा कर्जव्यवहार होणेचा संभव असतो. म्हणून बॅन्केने काळजी घेणे महत्वाचे ठरते.

गॅरंटीला बॅकेकडून व्याज आकारले जात नाही. त्यांचे रकमेवर १ ते २% कमिशन घेतले जाते. ते गॅरंटी देणेचे वेळी तारणावर अवलंबून असते. गरंटीचा धोका, नियम व अटीवर यावरून त्यांत बदल केला जातो कमिशन कमी जास्त करणेस बॅकेला अधिकार असतो.

सदर लेख लिहीणेचे कारण म्हणजे बकेतील व्यवहारांचा संबंध दिवसेन दिवस वाढतच आहे तरी अशा-प्रकारच्या व्यवहारांची कल्पना खातेदार, बॅका व इतर संबंधितांना असावी व त्यांचा फायदा संबंधितांनी घ्यावा इतकेच.

# औद्योगिक क्षेत्रातील संप – जेल भरो, मिल भरो कि मिल सुधारो

चालू 'उत्पादकता वर्षातच' औद्योगिक क्षेत्रात कमालीची अशांतता वाढत असून, संप आणि टाळेबंदी यांनी देशातील उत्पादकतेला खीळ बसली आहे. धंदेवाईक, ध्येयशून्य कामगार चळवळींनी अक्षरशः उद्योगक्षेत्राला ओलीस ठेवले आहे. आश्चर्याची गोष्ट ही की यात सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगातही संप-मोर्चे-हरताळ यांना उत आला आहे.

महाराष्ट्रातल्या गिरणी कामगारांचा संप आता १० महिन्याचा झाला आहे. या संपाचा कालावधी इतका अतोनात वाढला आहे की, त्यातून योग्य तोड काढण्यासारखी परिस्थिती हाताबाहेर गेली आहे. एका दृष्टीने पाहिले तर मुंबईच्या आजारी आणि जीर्णशीर्ण यंत्रसामग्री झालेल्या आर्थिक दृष्ट्या अशक्त गिरण्यांना हा संप म्हणजे अप्रत्यक्ष वरदानच आहे. गिरण्या चालू राहिल्या असत्या तर उत्पादन वाढले असते मात्र मुंबईच्या गिरण्यांचा तोटाच वाढत गेला असता. त्यामुळे गिरणी-मालक एका अर्थी खुष आहे. दुसऱ्या बाजूने गिरणी कामगारालाही तुलनेने कमी वेतन मिळत असल्याने, संपकाळात त्याला युनियनकडून, म्हणजेच युनियनच्या माध्यमाने संपाविरोधी शक्तींकडून आर्थिक सहाय्य मिळत आहे. कामाशिवाय आळसात वेळ काढण्यापेक्षा काहींनी मुंबईतल्या मुंबईत इतरत्र रोजगारही मिळविला आहे.

या वर्षातील मुंबई गिरणी संप, देशातील कामगार-चळवळीला एक वेगळं वळण देणारी ऐतिहासिक घटना आहे. आजारी गिरण्या आणि अवाजवी वेतन वाढवून मागणारा कामगार या दोहोंच्या संघर्षात, आर्थिक सिद्धांतच अतिमक्षणी प्रभावी होतील. यापुढे वेतन मागणाऱ्यांनीही रास्त वेतनाचा विचार करावा लागेल आणि किमान शहरी गरजा भागविणारे वेतन परवडण्याकरिता गिरण्यांची कार्यक्षमता व्यवस्थापकांना प्रत्याधुनिक यंत्रसज्ज करावी लागेल. या दोन्ही संभाव्यतेमुळे कामगार वर्गातील सौदेशक्तीला संयमित मुरड बसेल आणि मुंबईतील जुनाट गिरण्यांचे आधुनिकीकरण होऊन, देशातील उत्पादकतेला एक वेगळी गति येईल. कोणत्याही संघर्षातूनच विकास होत असतो. कारण परिस्थितीचे योग्य बुद्धिनिष्ठ विश्लेषण आणि निदान हे अशा स्फोटक प्रसंगीच होऊ शकते, अन्यथा दोन्ही बाजूंकडून प्रश्नाची उपेक्षा होण्याचा संभव असतो.

गेल्या एक वर्षातील गिरणी कामगार संप हा अमिताभ बच्चनच्या आजारपणाखालोखाल गाजला! अमिताभ सुपरस्टार असणे यात भूतकाळ व भविष्यकाळ या परिमितीने पाहिल्यास फार अंतर आहे. गेल्या एक वर्षातील संपाने मुंबई येथील कापड व्यवसाय हा मुंबईतून केव्हाच बाहेर पडला आहे. तामीळनाडूच्या कापड उद्योगाला या संपाचा सर्वात मोठा लाभ झाला असून, मुंबईचे या क्षेत्रातील अग्रस्थान पुन्हा मुंबईस नजिकच्या ५/६ वर्षात मिळेल अशी चिन्हे नाहीत.

आर्थिक सिद्धांत हे फारसा गाजावाजा न करता, आपले कार्य बिनबोभाट करीत असतात. राजकीय चळवळींच्या लाटा भरती ओहोटीप्रमाणे कमीजास्त होतात आणि त्या लाटांनाच आपण समुद्र समजतो. लाटांच्या खाली व्यवहार समुद्रात जे मंथन चालते ते आर्थिक स्वरूपांचेच असते. आणि त्यांची शक्ती गूढ, निःस्तब्ध व प्रभावी असते.


Regd No. PNC 205 Licence to post without prepayment No. 61


# एकमेका साह्य करू अवघे धरू सुपंथ

आपल्या कसबी हातांचा उपयोग करून स्वतःच्या पायावर उभे रहाण्याची धडपड करणारे उद्योजक सभोवती पाहतांना आम्हाला खूप समाधान वाटते. आमचे तंत्रज्ञान, प्रासंगिक मार्गदर्शन आणि नेहमीच लाभणारे [illegible] विर [illegible] कितीतरी चांगल्या गोष्टी घडवून आणतात...अधिक उत्पादन, [illegible] रोजगार, दरडोई अधिक उत्पन्न मिळविण्याची सुसंधि... ह्या तर सगळ्या प्रगतीच्याच वाटा...सर्वांच्याच हिताच्या!

अशा होतकरू अन् ध्येयवादी उद्योजकांच्यासाठी आम्ही जे काही करतो, त्यामागे आमची भावना कर्तव्याची असते... एकमेका साह्य करूनच साफल्याचा सुपंथ धरता येईल याची आम्हाला जाणीव आहे.

**किर्लोस्कर डिझेल इंजिने...**
**भारतामध्ये सर्वाधिक विकली जाणारी!**



**किर्लोस्कर ऑईल इंजिन्स लिमिटेड**
लक्ष्मणराव किर्लोस्कर पथ, खडकी, पुणे ४११००३


सत्यं शिवं सुंदरम् प्रकाशनच्या मालकीचें हे मासिक संपादक व मुद्रक प्रा. कमलाकर परचुरे यांनी 'वैशाली प्रिंटर्स', १८१ शुक्रवार पेठ, पुणे २. येथे छापून ९२६ शिवाजीनगर पुणे ४ येथे प्रसिद्ध केले.